नि.दि.दा.क्र.२५/२०१७
नि.१२७
सुर्यकांत वि. माधव व इतर

## <u>वादीतर्फे साक्षीदार क्र. ५</u>

नाव – सुरेश प्रभाकर वाघचौरे
वय – ५२ वर्ष, व्यवसाय – तहसीलदार, पारशिवनी
राहणार.– पारशिवनी जि. नागपूर

**<u>नि. क्र. १०२ वरील आदेशान्वे. वादीतर्फे साक्षीदार क्र. ५ चा सरतपास श्री एम.डी. पालीवाल वकील साहेब यांच्यामार्फेत शपथेवर सुरुः</u>**

**१.** मी आज रोजी तहसीलदार पारशिवनी या पदावर कार्यरत आहे. या पदाचा कार्यभार स्वीकारता वेळेस मी नियमाप्रमाणे संपूर्ण दस्तांचा कार्यभार मला प्राप्त झाला होता. तहसील कार्यालयामार्फेत कर मागणीची नोटीस पाठविली जाते. आता मला दि. ०९/१२/१९८७ रोजीची जानराव व्यंकटराव तरार यांच्या नावे गट नं. १९८ बाबत कसूरदारास मागणीची नोटीसची मूळ प्रत दाखविली. त्यावर तहसील कार्यालयाचा शिक्का व संबंधीत अधिकारीची सही आहे. सदर नोटीस तहसील कार्यालयामार्फेत देण्यात आली आहे. त्यास **नि.क्र. १२८** देण्यात येते. या पावती संबंधात दुय्यम प्रत कार्यालयात शोध घेतला असता मिळून आली नाही. सदर दुय्यम प्रत का मिळून आले नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. आता मला दस्त यादी क्रमांक ५९ सोबत लावलेला दस्त क्रमांक २० दि. २५/०३/२००२ रोजीची जानराव व्यंकटराव तरार यांच्या नावे गट नं. ४३४ बाबत कसूरदारास मागणीची नोटीसची झेरॉक्स प्रत दाखविली. त्यावर तहसीलदार गोखले यांचे नाव दिसून येते. सदर नोटीस तहसील कार्यालयामार्फेत देण्यात आल्याचे दिसते. त्यास **आर्टिकल '१'** देण्यात येते. या पावती संबंधात दुय्यम प्रत कार्यालयात शोध घेतला असता मिळून आली नाही. सदर दुय्यम प्रत का मिळून आले नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.

२. आता मला दि. २७/११/१९९६ रोजीची व दि. ०२/०२/१९९३ रोजीची जानराव व्यंकटराव तरार यांच्या नावे गट नं. ४३४ बाबत कसूरदारास मागणीची दोन नोटीस **आर्टिकल 'बी' व 'सी'** मूळ प्रत दाखविल्या.त्यावर तहसील कार्यालयाचा शिक्का व संबंधीत अधिकारी यांची सही आहे. सदर नोटीस तहसील कार्यालयामार्फत देण्यात आल्या आहेत. त्यास अनुक्रमे **नि. क्र. १२९ व १३०** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास प्रतिवादी क्र. १ व ११ तर्फे श्री पियुष सायरे वकील साहेब यांच्यामार्फत शपथेवर सुरु**

३. मी तहसीलदार पारशिवनी या पदाचा कार्यभार सन २०२४ साली घेतला.मागणी केलेल्या दस्तांचा मी कार्यालयात शोध घेतला. रेकॉर्ड रुम येथील संबंधित कर्मचाऱ्यांच्या अभिप्रायावरुन मी सदर दस्त कार्यालयात उपलब्ध नाही असे सांगत आहे. एखाद्या गट नंबरचा भोगवटतदार एका पेक्षा जास्त व्यक्ती असल्यास कुणा एका व्यक्तीस सुद्धा कसूरदार म्हणून कार्यालय नोटीस देते.

**उलटतपास पुर्ण .**

**फेर–तपास नाही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्वीकृत | समक्ष |
| GAJENDRA ONKARRAO WANKHADE Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE Date: 2026.04.21 13:07:29 +0530 | GAJENDRA ONKARRAO WANKHADE Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE Date: 2026.04.21 13:07:34 +0530 |
| **(जी. ओ. वानखडे)** | **(जी.ओ.वानखडे)** |
| दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर |
| पारशिवनी | पारशिवनी |

दिंनाकः२१/०४/२०२६